I.I.F.-I (एकीकृत अन वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 173 B.N.S.S)**

**प्रथम खबर अहवाल**

**(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)**

1. **District (जिल्हा):** मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय **P.S. (पोलीस ठाणे):** मिरा रोड **Year (वर्ष):** 2024

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0317 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 16/10/2024 02:33 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भारतीय दंड संहिता १८६० | 120-B |
| 2 | भारतीय दंड संहिता १८६० | ३२३ |
| 3 | भारतीय दंड संहिता १८६० | ३४ |
| 4 | भारतीय दंड संहिता १८६० | ४०६ |
| 5 | भारतीय दंड संहिता १८६० | ४१९ |
| 6 | भारतीय दंड संहिता १८६० | ४२० |
| 7 | भारतीय दंड संहिता १८६० | ४६५ |
| 8 | भारतीय दंड संहिता १८६० | ४६७ |
| 9 | भारतीय दंड संहिता १८६० | ४६८ |
| 10 | भारतीय दंड संहिता १८६० | ४७१ |

3. (a) **Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):**

1 **Day (दिवस):** मधले दिवस **Date from (दिनांक पासून):** 01/01/2018 **Date To (दिनांक पर्यंत):** 24/06/2024

**Time Period (कालावधी):** **Time From (वेळेपासून):** 00:00 तास **Time To (वेळेपर्यंत):** 00:00 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 16/10/2024 **Time (वेळ):** 01:00 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 007 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 16/10/2024 01:53 तास

4.

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

**Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्थळ):**

**1. (a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** पूर्व, 2 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** गाला नं, 22,23,24, व्हि अनबिटेबल डान्स स्टुडीओ , स्प्रींग रोज बिल्डींग,गौरव सिटी,मिरारोड पुर्व

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (State) (जिल्हा (राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** वीर गोविंदन नरोत्तम

**(b) Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):**

**(c) Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष):** 1998 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No. (पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख ):** **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))**

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

**(h) Occupation (व्यवसाय):**

**(i) Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | एम 34, आंबेडकर नगर, गल्ली नं 5,, सुभाषचंद्र बोस गार्डनसमोर,, भाईंदर ताजि ठाणे, मिरा रोड, मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | एम 34, आंबेडकर नगर, गल्ली नं 5,, सुभाषचंद्र बोस गार्डनसमोर,, भाईंदर ताजि ठाणे, मिरा रोड, मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय, महाराष्ट्र, भारत |

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल क्र.):** 91-8898891626

**7. Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | ओमप्रकाश शंकर चौहान | | | 1. Town/Village (शहर / गाव): पता माहीत नाही,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): मिरा रोड,District (जिल्हा): मिरा-भाईदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 2 | रोहीत जाधव | | | 1. Town/Village (शहर / गाव): पत्ता माहीत नाही,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): मिरा रोड,District (जिल्हा): मिरा-भाईदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |
| 3 | फ्रेम प्रोडक्शन कंपनी प्रा.ली. | | | 1. 606,6 वा माळा,मोर्या लन्ड मार्क -2नविन लिंक,Town/Village (शहर / गाव): रोड,अंधेरी पश्चिम,Tehsil (तहसील): मुंबई,Police Station (पोलीस ठाणे): मिरा रोड,District (जिल्हा): मिरा-भाईदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |
| 4 | रेमो डिसुजा एन्टरटेंमेंट प्रा. संचालक रेमो डिसुजा | | | 1. 101,102,पराडाईज बिल्डींग,मिल्लत नगर,ओशिवरा,Town/Village (शहर / गाव): अंधेरी पुर्व,मुंबई,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): मिरा रोड,District (जिल्हा): मिरा-भाईदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 5 | रेमो डिसुजा एन्टरटेंमेंट संचालक लिल रेमो डिसुजा | | | 1. 101,102,पराडाईज बिल्डींग,मिल्लत नगर,ओशिवरा,Town/Village (शहर / गाव): अंधेरी पुर्व,मुंबई,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): मिरा रोड,District (जिल्हा): मिरा-भाईदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |
| 6 | रेमो डिसुजा | | | 1. 101,102,पराडाईज बिल्डींग,मिल्लत नगर,ओशिवरा,Town/Village (शहर / गाव): अंधेरी पुर्व,मुंबई,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): मिरा रोड,District (जिल्हा): मिरा-भाईदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |
| 7 | विनोद राऊत | | | 1. गुन्हे शाखा,मिभाववि,Town/Village (शहर / गाव): पोलीस आयुक्तालय,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): मिरा रोड,District (जिल्हा): मिरा-भाईदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 8 | रमेश गुप्ता | | | 1. शप नंबर 6,गिरजाभवन बिल्डींग,Town/Village (शहर / गाव): क्रस कबीन रोड,नर्मदा नगर,Tehsil (तहसील): भाईंदर पुर्व,जि ठाणे,Police Station (पोलीस ठाणे): मिरा रोड,District (जिल्हा): मिरा-भाईदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

**8.** **Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

**9.** **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 11,96,10,000/ | 11,96,10,000.00 |

**10.** **Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :** 11,96,10,000.00

**11.** **Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

**12.** **First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

फिर्याद दिनांक 15/10/2024

मी वीर गोविंदन नरोत्तम, वय - 26 वर्षे, व्यवसाय- डान्सर, रा.- एम 34, आंबेडकर नगर, गल्ली नं. 5, सुभाषचंद्र बोस गार्डनसमोर, भाईंदर, पश्चिम, ता.जि. ठाणे, मोबाईल क्र. 8898891626 समक्ष मिरारोड पोलीस ठाणे येथे हजर राहुन फिर्याद लिहुन देतो की,

मी वरील प्रमाणे असुन वरील ठिकाणी 20 वर्षापासून रहात आहे. माझे शिक्षण हे इयत्ता 12 वी पर्यंत झाले आहे. मी डान्स कलाकार असुन त्यावर माझा व माझ्या परिवाराचा उदरनिर्वाह चालतो. माझी ओळख ओमप्रकाश शंकर चौहान याच्याशी 2014 मध्ये आरीफ मार्फत झाली. तेव्हा आंम्ही

भाईंदर पुर्व येथील जेसलपार्क खाडी येथे डान्सचा सराव करत असताना ओमप्रकाश चौहान हा आमचे कडे येत असे व तिकडे बसत असे. त्यावेळी त्याने आंम्हाला तुम अच्छे डान्सर हो, मेरे को भी तुम्हारे साथ लेले, मिलके कुछ अच्छा करेंगे, आप लोग डान्स मे बिझी रहते हो, मैं न्स्टाग्राम और यु टयुब पर अकाऊंट और आप लोग के डान्स परफॉर्मन्स को अपलोड करता हुॅ, जिससे हमारे पास लोग अप्रोच करेंगे और हमको शोज मिलेंगे और हम लोग पैसे भी कमा लेगे असे सांगीतले. तेव्हा आंम्हाला पण आमच्या गृपचा सोशल मिडीया सांभाळण्या करीता एक मॅनेजरची आवश्यकता होती. म्हणुन आंम्ही ओमप्रकाश चौहान यास गृप मध्ये सामील करुन घेतले. त्यावेळी माझ्या बरोबर इतर 25 कलाकार नामे 1) मोहम्मद आरिफ 2) अजय कांबळे 3) तृप्ती पिंगुळकर 4) विशाल यादव 5) ओमकार महाला 6) प्रणित गायकवाड 7) प्रीतेश भोईर 8) रोहन थापा 9) चिरण विश्वकर्मा 10) अर्जुन वटार 11) सचिन सोनी 12) कुमार नागाया 13) दिनेश चौधरी 14) सुरज सोनी 15) अनुश हरिजन 16) प्रविण आरक 17) सागर मुर्ती 18) अभिषेक माले 19) प्रणव गमरे 20) बादल गागत 21) आकाश चौहान 22) आकाश जैसवाल 23) डबलु खारवांर 24) वेदांत म्हात्रे 25) संजय चव्हाण असे होते. आंम्हा सर्वांचे वय हे 08 ते 20 वर्ष होते. तेव्हा आंम्ही "Unbeatable dance group" या नावाने गृप चालवत होतो.

मी व माझे इतर सहकारी कलाकार आंम्ही सन 2014 पासुन डान्स प्रॅक्टिस करुन विविध स्टंट सराव करत होतो. ओमप्रकाश चौहान हा आमचे सांगणेनुसार आमच्या गृपचा सोशल मिडीया व आमचे शो मॅनेज करत होता. आमची आर्थिक परिस्थिती गरिबीची व हलाखीचे असल्याने आंम्ही ओमप्रकाश चौहान याचेवर विश्वास ठेऊन आंम्ही फक्त आणि फक्त डान्स प्रॅक्टिस करत होतो. सन-2015 मध्ये आमच्या गृपमधील विकास गुप्ता याचा अपघाती मुत्यू झाल्याने नमुद ग्रुपला "V.Unbeatable dance group" हे नाव दिले. आणि नवीन ग्रुप तयार करुन त्यामध्ये साधारण 30 ते 35 डान्स कलाकार होते. त्या माध्यमातुन आंम्ही स्टेज शो व कॉम्पीटेशन शो करत होतो. त्यावेळेस ओमप्रकाश चौहान हा मॅनेजर या नात्याने आमच्या गृपच्या वतीने आमचे सांगणेवरुन डांन्स शो चे तसेच रियालीटी शो चे आयोजक यांचे सोबत पैश्यांबाबत व शो च्या तारखा बाबत बोलणे करुन गृप सोबत कॉर्डीनेट करत होता. तेव्हा त्याने शो चे ठरलेले पैसे हे प्रत्येकाचे बँक खात्यात जमा होतील असे सांगितले होते. त्याच दरम्यान सन 2016 मध्ये मला ओमप्रकाश चौहान याने तो मुळचा नेपाळ येथील असुन त्याचा नेपाळ येथील पासपोर्ट मला दाखवीला. तेव्हा मला समजले की, तो मुळचा नेपाळ येथील आहे. त्या पासपोर्टवर त्याचा फोटो लावलेला होता व नाव ओमप्रकाश लुनिया असे व पारपत्र क्रमांक 4224671 लिहलेले होते. व त्याचेवर जन्म तारीख 15/04/1990 असे लिहले होते. म्हणुन मी सदर पासपोर्टचा फोटो माझ्या मोबाईल मध्ये काढुन घेतला होता.

त्यानंतर सन-2018 मध्ये डान्स प्लस रियालिटी शो सिजन 4 हा मुंबई मध्ये केला होता. सदर शो मध्ये आंम्ही धर्मेश येलांडे यांच्या टिम मध्ये होतो. तेथे आंम्हाला डान्स प्लस रियालिटी शो कडुन एक असिस्टंट कोरियोग्राफर रोहीत जाधव देण्यात आला होता. आंम्ही सदर शो पुर्ण केला व त्याचे 5,00,000/- रुपये बक्षीस ठरले होते. तर प्रोडेक्शनने रुपये 1,00,000/- किंमती चे व्हाऊचर दिले होते. नमुद रक्कमेची व व्हाऊचरचे ओमप्रकाश चौहान याने आंम्हाला वाटप केले नाही. आंम्ही सदर शो साठी 35 डान्सर होतो व सदर शो करीता आंम्ही जवळपास 38 दिवस शुट केले होते. त्यावेळी प्रत्येक आर्टीस्ट साठी 7,000/- रुपये प्रती दिवस पगार दिला जात असे. सदर फ्रेम प्रोडक्शन यांनी

आंम्हा 35 डान्सरचा प्रती दिवसाचा पगार असा एकुण 93.10 लाख रुपये देणे आवश्यक होते. परंतु सदर फ्रेम प्रोडक्शन यांनी आंम्ही केलेल्या शुटचे पैसे आंम्हाला दिलेली नाही.
सदर शो चे जज रेमो डिसुझा हे होते. त्यांनी आमचे जिवनावर चित्रपट काढणार असल्याचे सांगुन आमचे कडुन इंनटेलेक्चुअल प्रॉपरर्टी राईट (आय.पी.आर) व एन.ओ.सी. अग्रीमेंट घेतली होती. सदर चित्रपट पुर्ण झाल्या नंतर आंम्हाला 50,00,000/- रुपये देणार असल्याचे कबुल करुन तसा करार रेमो डिसुजा एन्टरटेंमेंट प्रा.ली. कंपनी तर्फे रेमो डिसुजा व लिझेल डिसुजा व आमच्यात झाला होता. सदर रक्कमे मधुन त्याबाबत साईन अमाऊट म्हणुन 5,11,000/- रुपये हे रेमो डिसुजाने ओमप्रकाश चौहान यास दिले होते. त्याचे पैसे देखील आंम्हाला ओमप्रकाश चौहानने दिले नाहीत. आंम्ही वेळो वेळी ओमप्रकाश चौहान याला विचारणा केली त्यावेळी त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यानंतर आंम्ही रेमो डिसुजा व लिझेल डिसुजा यांना संपर्क करुन त्यांना वेळोवेळी भेटून लवकरात लवकर चित्रपट तयार करा अथवा आमचे घेतलेले इंनटेलेक्चुअल प्रॉपरर्टी राईट (आय.पी.आर) व एन.ओ.सी परत द्या अशी विनंती केली कारण त्यांनी खुप वेळ घेतला होता व आंम्हाला काही मोबदला देखील दिला नव्हता. त्यावेळी त्यांनी आंम्हाला योग्य व समर्पक उत्तरे दिली नाहीत. व त्यांनी आमचे इंनटेलेक्चुअल प्रॉपरर्टी राईट (आय.पी.आर) व एन.ओ.सी परत देण्यास नकार दिला. त्यामुळे आंम्हाला इतर प्रोडक्शन हाऊस यांचे कडुन आमचे जिवनावरील बायोग्राफीवर चित्रपट तयार करता आला नाही.
सन 2019 मध्ये America’s Got Talent- season 14 या रियालिटी शो ची ऑफर आंम्हाला ई मेल मार्फत आली. तेव्हा आंम्ही स्वखर्चाने स्वत:चे पासपोर्ट काढले. त्यावेळी ओमप्रकाश चौहान याने देखील भारतीय पासपोर्ट काढला होता. त्यावेळी आंम्ही 33 डान्स कलाकार हे अमेरिका मध्ये गेलो होतो. ओमप्रकाश चौहान याने रोहीत जाधव यास मदतनीस म्हणुन सोबत घेतले होते. मॅरेथॉन प्रॉडक्शन, अमेरीका यांनी आंम्हा सर्वांच्या विमान प्रवासाचे तिकीट व रहाण्याचा खर्च केला होता. सदर ठिकाणी आंम्ही एकुण 60 दिवस थांबलो होतो. त्यावेळी ओमप्रकाश चौहान हा आंम्हाला एकावेळचे जेवण देत होता. सदरचा शो संपल्यानंतर आंम्हाला समजले की, मॅरेथॉन प्रॉडक्शन, अमेरीका हे आमच्या ग्रुप मधील डान्स कलाकारांना प्रत्येक दिवशी 25 डॉलर प्रत्येकी पर डे अलावन्स देत होते. परंतु ओमप्रकाश चौहान याने पर डे अलावन्सचे साधारण 44,64,000/- रुपये असे सर्व पैसे स्वत:कडे घेवुन त्यापैकी आंम्हास फक्त एक वेळचे जेवण देत होता व उर्वरीत रक्कम स्वत:कडे ठेवुन घेत होता. सन-2020 मध्ये अमेरिका गॉट टॅलेन्ट द चॅम्पियन सिजन 2 या रियालिटी शो मध्ये सर्व कलाकारांनी भाग घेतला होता. सदरचा शो आंम्ही जिंकल्याने आमच्या ग्रुपला 25,000 डॉलर (सुमारे 17,50,000/- रुपये) प्राप्त झाले होते हे आंम्हाला ओमप्रकाश चौहान याने त्यावेळी सांगितले नाही. व त्याचे ग्रुप मधील कलाकारांना वाटप देखील केले नाही. परंतु सदर रक्कमे मधुन काही रक्कम ओमप्रकाश चौहान याने आमचे नकळत रोहीत जाधव यास परस्पर देऊन टाकली होती. हे आंम्हाला नंतर समजले आहे.
आंम्ही वरिल सर्व “V.Unbeatable dance group” या नावाने चालवीत असलेला गृप हा ओमप्रकाश शंकर चौहान याने आंम्हा वरील सर्वांचे नकळत आमच्या लहाणपणाचा व अज्ञानाचा फायदा घेवुन दिनांक 25/01/2019 रोजी ट्रेडमार्क रजिट्रेशन कार्यालयात स्वत:च्या नावे रजिस्ट्रर करणे करीता अर्ज देवुन दिनांक 04/01/2020 रोजी आमची फसवणुक करुन स्वत:च्या नावे नोंद करुन घेतला आहे. हे

आंम्हाला फेब्रुवारी 2024 मध्ये कळले आहे. सन 2020 च्या पुर्वी आमचे गृपचे येणारे सर्व पैसे ओमप्रकाश चौहान हा त्याचे स्वत:चे, मित्रांच्या व नातेवाईकांच्या वैयक्तिक बॅक खात्यात घेत होता अस अंाम्हाला संशय आला. तेव्हा सदरचा ग्रुप कोणत्याही संस्थेकडे रजिस्टर केला नव्हता. ओमप्रकाश चौहान याने सदर गृप हा रजिस्टर करुन घेतल्या नंतर आमच्या "V.Unbeatable dance group" याचे डान्स प्रोग्रामचे पैैसे हे गृपच्या नावे तयार केलेल्या एच.डी.एफ.सी बॅक खाते क्रमांक 50200045671740 या खात्यात व इतर खात्यात घेऊ लागला. त्याच वेळी त्याने आंम्हा सर्वांचे एच.डी.एफ.सी. बॅकेत अकाऊन्ट उघडले. त्या खात्यात ओमप्रकाश चौहान हा त्याचे स्वत:चे व इतर खात्यातून आमचे खात्यात तुटपंजी रक्कम जमा करत होता.

सन 2020 मध्ये महेश मोरे हा आमच्या गृपमध्ये आला व आंम्ही त्याच्या कडे गृपचे सर्व मॅनेजमेंट दिले होते. कारण आंम्हाला ओमप्रकाश चौहानवर संशय झाला होता आणि आमचेकडे गृपच्या रजिस्ट्रेशनबाबत तसेच ओमप्रकाश चौहान व आमचेमध्ये कोणताही लेखी अथवा तोंडी करार नव्हता.

जानेवारी 2020 मध्ये आंम्ही कलाकार हॉंगकॉंग चायनिज फेस्टीवल- 2020 येथे शो करीता गेलो असता सदरचा शो हा कोविड प्रार्दुभावामुळे रद्द झाला परंतु शो चे आयोजन करणायांनी आमच्या डान्स ग्रुपला 10,000/- डॉलर (सुमारे 7,60,000/-रुपये) इतकी रक्कम ओमप्रकाश चौहान याचेकडे दिली होती हे आंम्हाला आमचे गृपमधील महेश मोरे यांचेकडून समजले. परंतु ओमप्रकाश चौहान याने ती रक्कम आंम्हाला दिली नाही. त्यानंतर लॉकडाऊन दरम्यान "V.Unbeatable dance group" या आमच्या ग्रुपला भारतातील व परदेशातील संस्थांनी वेळोवेळी डोनेशन दिले होते आणि आजपावेतो देखील देत असावेत. परंतु ओमप्रकाश चौहाण याने आंम्हाला या डोनेशनबाबत कधीही काहीही कळविले नाही. ओमप्रकाश चौहान याने डोनेशन मधून मिळणाया सर्व रक्कमेचा एकमेव लाभार्थी आहे. ओमप्रकाश चौहान याने त्या डोनेशन रक्कमेबाबत गुप्त ठेवली आणि डोनेशनचा वापर आमच्या ग्रुपमधील कलाकारांसाठी केला नाही.

जानेवारी 2023 मध्ये दुबई मध्ये ग्लोबल व्हिलेज हा एक महीण्याचा शो केला होता. त्यात 45 सदस्य गेले होते. नमुद शो मध्ये आंम्ही 75 शो केले होते त्याकरीता 2,88,000 डॉलर (सुमारे 2,30,40,000/-रुपये) इतकी रक्कम आमच्या ग्रुपला मिळाली होती. त्यापैकी आमच्या ग्रुपमधील 25 कलाकारांना प्रत्येकी 1,40,000/-रुपये इतकी रक्कम वाटप करुन बाकीची रक्कम ओमप्रकाश चौहान याने स्वत:कडेच ठेवली होती. ओमप्रकाश चौहान याचेकडे आंम्ही सन 2015 पासुन सन फेब्रुवारी 2024 पर्यंत अंदाजे 250 + शो भारतात व परदेशात विविध ठिकाणी केले असुन प्रत्येक शो केल्याचे अंदाजीत 4,00,000/- रुपये आमच्या कामाचे तसेच "V.Unbeatable dance group" या नावे युटुब, इंनस्टाग्राम, फेसबुक व्दारे मिळणारे सर्व उत्पन्न मिळून अंदाजे 11,96,10,000/- रुपये त्याचे कडे जमा झाले होते. आंम्ही केलेल्या शो पैकी 96 शो चे इन वाईस आमचेकडे उपलब्ध आहेत परंतु उर्वरीत शो चे इन वाईस हे ओमप्रकाश चौहान याने त्याचेकडे गुप्त ठेवले आहेत. परंतु मला सन 2018 पासुन ते मार्च 2024 पर्यंत माझ्या एच.डी.एफ.सी. बॅक खाते क्रमांक 50100326191409 या खात्यावर 16,64,684/- रुपये ऐवढी रक्कम ओमप्रकाश चौहान याने दिले आहेत.

आंम्ही ओमप्रकाश चौहान याचे कडे सदर गृप मध्ये न लेखी न तोंडी ठरलेल्या भागीदारी नुसार हिस्सा मिळत नसले बाबत वारंवार विचारणा केली. तसेच आमचे गृप मधील परफॉर्म करणारे आणि

मयत विकास यांचे हिश्याचे पैसे हे कोणाला देत आहे याबाबत विचारणा केली असता त्याने सदर पैसे हे विकास याचे वडील रमेशचंद बसंतलाल गुप्ता यास देत असल्याचे सांगीतले. त्यानंतर आंम्हाला माहीत झाले की, रमेशचंद बसंतलाल गुप्ता हा मयत विकास यांचे खरे वडील नसून ओमप्रकाश चौहान याने आंम्हाला फसवीण्यासाठी मयत विकास याचे बनावट वडील तयार केले आहेत. रमेशचंद गुप्ता याने रियालटी शो डान्स प्लस सिझन 4 मध्ये येवून त्याठिकाणी देखील आपण मयत विकास याचे खरे वडील असल्याचे सांगितले आहे. ओमप्रकाश चौहान याने आंम्ही सर्वांनी मिळून तयार केलेला "V.Unbeata
dance group" या गृपचे सर्व राईट स्वत:च्या नावे करुन घेतले असुन "V.Unbeatable dance group" या गृपचे सर्व सोशल मिडीया अकाऊन्ट पण त्याचे कडे ठेवुन घेवुन ओमप्रकाश चौहान याने आमची "V.Unbeatable dance group" या नावाची ओळख चोरुन मला तसेच 1) मोहम्मद आरिफ 2) अजय कांबळे 3) तृप्ती पिंगुळकर 4) विशाल यादव 5) ओमकार महाला 6) प्रणित गायकवाड 7) प्रीतेश भोईर 8) रोहन थापा 9) चिरण विश्वकर्मा 10) अर्जुन वटार 11) सचिन सोनी 12) कुमार नागाया 13) दिनेश चौधरी 14) सुरज सोनी 15) अनुश हरिजन 16) प्रविण आरक 17) सागर मुर्ती 18) अभिषेक माले 19) प्रणव गमरे 20) बादल गागत 21) आकाश चौहान 22) आकाश जैसवाल 23) डबलु खारवांर 24) वेदांत म्हात्रे 25) संजय चव्हाण या सर्वांना ग्रुप मधुन बाहेर काढुन टाकले. त्यानंतर ओमप्रकाश चौहान यांने "V.Unbeatable dance group" या ग्रुपचे इंस्टाग्राम हॅन्डलवर रेमो डिसुजा हा स्वत: उपस्थित राहून असे उद्गार काढले की, या गृपमध्ये असणारे सर्व डान्सर हे डुप्लिकेट आणि फेक डान्सर आहेत. येथे फक्त ओमप्रकाश चौहान व रमेशचंद गुप्ता हे खरे आहेत. असा बाईटचा व्हिडीओ सोशल मिडीयावर पोस्ट वायरल केला. परंतु रेमो डिसुजा हा आंम्हास प्रत्येकाला वैयक्तीकरित्या ओळखत असताना जाणुन बुजून अशा प्रकारे व्हिडीओ प्रसारीत केल्याने आमचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

दिनांक 06/07/2024 रोजी आंम्ही सर्वजण आमचे आई व वडील यांना घेवुन ओमप्रकाश चौहान यांना भेटण्यासाठी आमचे व्हि. अनबिटेबल डान्स स्टुडीओ पत्ता गाळा नं. 22,23,24 स्प्रींग रोज बिल्डींग, कनकिया टाऊनशिप, गौरव सिटी, मिरारोड पुर्व, ता.जि.ठाणे येथे गेलो. सदरचा स्टुडीओ करीता ओमप्रकाश याने आंम्हा सर्वांकडुन प्रत्येकी 25,000/- रुपये घेतले होते. व सदर स्टुडीओ मधुन येणारे उत्पन्ना मध्ये देखील आंम्हाला हिस्सा देणार असल्याचे सांगीतले होते. परंतु त्याने आज पावेतो आंम्हाला सदर स्टुडीओ मधुन मिळणारे उत्पन्ना मधुन एकही रुपया दिलेला नाही. तेथे आमच्यात आणि ओमप्रकाश चौहान यांच्यात बोलाचाली होत असताना ओमप्रकाश चौहान याने सायबर क्राईम ब्रान्चचे पोलीस विनोद राऊत यास फोन करुन सदर ठिकाणी बोलावून घेतले. तेथे पोलीस विनोद राऊत व त्यांचे बरोबर काही पोलीस आले. तेव्हा पोलीस विनोद राऊत याने अर्वाच्र्य भाषेत बोलुन जाणिवपुर्वक आमच्यावर बळाचा वापर करुन ओमप्रकाश चौहान यास मदत करुन आमचे स्टुडीओमधून बाहेर काढुन गाडीमध्ये बसवीले. व आंम्हाला मिरारोड पोलीस ठाणे येथे इतर पोलीसां सोबत पाठवुन देऊन पोलीस विनोद राऊत हा तेथुन निघुन गेला होता.

तरी सन 2018 पासुन ते दिनांक 24/07/2024 रोजी पावेतो आरोपीत नामे - 1) ओमप्रकाश शंकर चौहान 2) रोहीत जाधव 3) फ्रेम प्रोडक्शन कंपनी प्रा.ली. ऑफीस पत्ता 606, 6 वा माळा, मोर्या लॅन्ड मार्क -2, नविन इंन्फीनिटी मॉलच्या समोर, नविन लिंक रोड, अंधेरी पश्चिम, मुंबई. 4) रेमो डिसुजा

एन्टरटेंमेंट प्रा.ली. कंपनीचे संचालक रेमो डिसुजा व लिझेल रेमो डिसुजा पत्ता- रुम नंबर 101, 102, पहिला माळा, पॅराडाईज बिल्डींग, मिल्लत नगर, ओशिवरा, अंधेरी पुर्व, मुंबई 5) रेमो डिसुजा 6) विनोद राऊत पत्ता - गुन्हे शाखा, मि.भा.व.वि. पोलीस आयुक्तालय 7) रमेश गुप्ता पत्ता - शॉप नंबर 6, गिरजाभवन बिल्डींग, क्रॉस कॅबीन रोड, नर्मदा नगर, भाईंदर पुर्व, जि. ठाणे. यांनी आपसात संगणमत करुन आमच्या कमी वयाचा व अल्प शिक्षणाचा फायदा घेवुन आरोपीत ओमप्रकाश चौहान याने आमचा "V.Unbeatable dance group" हा ग्रृप स्वत:चा मालकीचा असल्याचे भासवुन त्याव्दारे आमच्या "V.Unbeatable dance group" या ग्रृपला मिळालेल्या 11,96,10,000/- रुपये रक्कमेचा आमचा अन्यायाने विश्वासघात करुन फसवणुक केली आहे.मी माझ्या वकीलांशी चर्चा केली असून माझी भा.द.वि स कलम 323,419,420,406,465,467,468,471,120(ब),34 प्रमाणे फिर्याद आहे.
माझा वरील जबाब संगणकावर मराठीत टंकलिखीत केला असुन तो मी वाचुन पाहिला असता तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष लिहुन देतो की,

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

**(1)** **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** Chandrakant Sudhakar Sarode (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

**(2)** **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** **Rank (हुद्दा):**

**No. (क्र.):** **to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3)** **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):** **or (किंवा)**

**(4)** **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

Name (नाव): Chandrakant Sudhakar Sarode

Rank (हुद्दा): I (Inspector)

No. (क्र.): POBN73309

14. **Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

15. **Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen ) (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील)**

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन्मतारीख वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(से.मी) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | 1992 | | - | | **चेचक:** क्र. |
| 2 | पुरुष | 1988 | | - | | **चेचक:** क्र. |
| 3 | पुरुष | 2011 | | - | | **चेचक:** क्र. |
| 4 | पुरुष | 1974 | | - | | **चेचक:** क्र. |
| 5 | महिला | 1980 | | - | | **चेचक:** क्र. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 6 | पुरुष | 1974 | | - | | **चेचक:** क्र. |
| 7 | पुरुष | 1979 | | - | | **चेचक:** क्र. |
| 8 | पुरुष | 1969 | | - | | **चेचक:** क्र. |

| **Deformities / Peculiarities (व्यंग वैशिष्टये)** | **Teeth (दात)** | **Hair (केस)** | **Eye (डोळे)** | **Habit(s) (सवयी)** | **Dress Habit (s) (पोषाखाच्य सवयी)** |
|---|---|---|---|---|---|
| **8** | **9** | **10** | **11** | **12** | **13** |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

| Language/Dialect (भाषा/बोली) | Place of (चे ठिकाण) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**

**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल)**